महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३२ वे | दिनांक : २३/०१/२०२६ | वार : शुक्रवार

# छत्रपती संभाजीनगरचा महापौर कोण? आठ जणांची जोरदार चर्चा

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर महापालिकेत महापौरपदासाठीचा मार्ग अखेर मोकळा झाला असून आता सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराला महापौर होण्याची संधी उपलब्ध झाली आहे. महापालिकेचा निकाल जाहीर झाला असला तरी खऱ्या अर्थाने सत्तासंघर्षाला आता सुरुवात झाली आहे. कारण भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी महापौरपदासाठी कोणता चेहरा पुढे येणार, याबाबत पक्षांतर्गत हालचाली वेगाने सुरू आहेत. विशेषतः महापौरपदाच्या उमेदवाराची निवड करताना मंत्री अतुल सावे कोणत्या नावाला पसंती देतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने जोरदार कामगिरी करत ५७ नगरसेवक निवडून आणले आहेत. बहुमतासाठी भाजप केवळ एका जागेने कमी पडला असला, तरी प्रत्यक्ष राजकीय गणित पाहता स्वतंत्रपणे 'कमळ' चिन्हाचा महापौर बसण्याचे चित्र सध्या स्पष्ट दिसत आहे. भाजपला पाठिंबा देणारा एक नगरसेवक नेमका कोण असेल, हे अद्याप जाहिर झालेले नसले तरी, शहराचा कारभार सक्षमपणे आणि स्थिरपणे हाताळू शकणाऱ्या उमेदवारालाच महापौरपदी बसवावे, अशी भूमिका समर्थकांकडून मांडली जात आहे.

महापौरपदाच्या शर्यतीत सध्या अनेक नावांची चर्चा सुरू आहे. यामध्ये अनिल मकरिये, राजगौरव वानखेडे, महेश माळवतकर, विजय औताडे, शिवाजी दांडगे, समीर राजूरकर, सुरेंद्र कुलकर्णी आणि रेणुकादास वैद्य ही नावे पुढे आली आहेत. विशेष म्हणजे, महापालिका निवडणुकीत प्रमुख म्हणून काम पाहिलेले समीर राजूरकर यांचे नाव महापौरपदासाठी आघाडीवर मानले जात आहे. निवडणूक व्यवस्थापनातील त्यांचा अनुभव आणि पक्षातील सक्रिय भूमिका यामुळे ते महापौरपदाचे मजबूत दावेदार असल्याचे बोलले जात आहे. भाजपमधील अंतर्गत चर्चांमध्ये केवळ राजकीय ताकद नव्हे, तर प्रशासकीय समज, कायद्याचे ज्ञान आणि सभागृहातील कामकाजाची जाण या बाबींनाही महत्त्व दिले जात असल्याचे संकेत मिळत आहेत. महाराष्ट्र नगरपंचायत आणि नगरपालिकांच्या कायद्याचे सखोल ज्ञान असलेला, सर्वसाधारण सभेत स्पष्टपणे भूमिका मांडणारा आणि पारदर्शकतेचा आग्रह धरणारा मूळ भाजपचा नगरसेवक महापौर व्हावा, अशी मागणी पक्षातील काही नेत्यांकडून होत आहे. त्यामुळे केवळ लोकप्रियता नव्हे, तर प्रशासन चालवण्याची क्षमता हा निकष महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, आरक्षणाच्या मुद्द्यावरही मोठी चर्चा रंगली होती. जर महापौरपद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाले असते, तर भाजपची मोठी कोंडी झाली असती, अशी प्रतिक्रिया अनेक नेत्यांकडून व्यक्त होत होती. कारण त्या श्रेणीतून भाजपकडे उमेदवार नसून फक्त एमआयएमकडेच उमेदवार उपलब्ध होते. त्यामुळे काही काळ राजकीय वर्तुळात चिंतेचे वातावरण होते. मात्र अखेर सर्वसाधारण प्रवर्गासाठी महापौरपद खुले झाल्याने भाजपसह अनेकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

आता सर्वाधिक महत्त्वाची भूमिका मंत्री अतुल सावे आणि खासदार डॉ. भागवत कराड यांची असणार आहे. हे दोन्ही नेते कोणत्या नगरसेवकाचे नाव पुढे करतात, यावर महापौरपदाचा निर्णय मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार आहे. भाजपच्या कोअर कमिटीमध्ये कोणती राजकीय आणि संघटनात्मक गणिते मांडली जातात, याची उत्सुकता कार्यकर्त्यांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांनाच आहे. कारण महापौरपदाचा निर्णय केवळ एका व्यक्तीचा नसून, पुढील पाच वर्षांच्या शहराच्या कारभाराची दिशा ठरवणारा ठरणार आहे.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेचा निकाल लागला असला तरी प्रत्यक्ष सत्ता स्थापनेची लढाई आता रंगात आली आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरल्याने अपेक्षा उंचावल्या आहेत, मात्र त्याचबरोबर जबाबदारीही वाढली आहे. महापौरपदासाठीचा अंतिम निर्णय कोणाच्या बाजूने लागतो, याकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. छत्रपती संभाजीनगरचा पुढचा महापौर कोण, आणि भाजप कोणत्या चेहऱ्यावर विश्वास दाखवणार? हा एकच प्रश्न आता विचारला जात आहे.

# 'नॉट रिचेबल' नगरसेविकेचा शिंदे गटावर आरोप करत खळबळजनक खुलासा



**मुंबई :** महानगरपालिकेच्या सत्तास्थापनेच्या रणधुमाळीत 'नॉट रिचेबल' झाल्यामुळे चर्चेत आलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेविका सरिता म्हस्के अखेर समोर आल्या आहेत. "एका बड्या नेत्याने राजकीय स्वार्थासाठी आपल्याला पळवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना हुलकावणी देऊन मी नवस फेडण्यासाठी तुळजापूरला गेले होते," असा खळबळजनक खुलासा म्हस्के यांनी केला आहे. बुधवारी मध्यरात्री त्यांनी थेट आमदार मिलिंद नार्वेकर यांचे निवासस्थान गाठल्याने ठाकरे गटाने सुटकेचा निश्वास सोडला आहे.

महानगरपालिका निवडणुकीसाठी 15 जानेवारी रोजी झालेल्या मतदानानंतर 16 जानेवारीला निकाल जाहीर झाले. या निवडणुकीत प्रभाग क्रमांक 157 मधून सरिता म्हस्के विजयी झाल्या. काल सकाळी शिवसेना भवन येथे बोलावण्यात आलेल्या नगरसेवकांच्या बैठकीला डॉ. सरिता म्हस्के गैरहजर होत्या. इतकेच नव्हे तर कोकण भवन येथे पक्षाचा 'गट' नोंदवण्यासाठी सर्व नगरसेवक गेले असतानाही म्हस्के तिथे पोहोचल्या नव्हत्या. त्यांचा फोन बंद असल्याने त्या शिंदे गटाच्या संपर्कात असून लवकरच तिथे प्रवेश करतील, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली होती. मात्र, डॉ. सरिता म्हस्के या पुन्हा पक्षाच्या संपर्कात आल्या आहेत. काल दिवसभरात काय-काय घडले? याबाबत सरिता म्हस्के यांनी सांगितले.

बुधवारी दिवसभर घडलेल्या सर्व प्रकरणावर स्पष्टीकरण देताना सरिता म्हस्के म्हणाल्या, "निवडणुकीत विजय मिळाल्यास तुळजाभवानीचा नवस फेडायचा असे मी ठरवले होते. निकालानंतर मी तातडीने तुळजापूरला गेले. तिथे मोबाईलला रेंज नसल्याने मुंबईत काय गोंधळ सुरू आहे, याची मला कल्पना नव्हती."ऱ

सरिता म्हस्के म्हणाल्या, "मोबाइल सुरू होताच सर्व गोष्टींचा उलगडा झाला. त्यामुळे तातडीने मिलिंद नार्वेकर यांच्याशी संपर्क साधून सर्व प्रकार त्यांच्या कानावर घातला. आळेफाट्याजवळील बेल्डा आणकुटी येथील म्हस्के वाडीत आज पालखी होती. आम्ही तेथेही जाणार होतो, परंतु मुंबईतील घडामोडी लक्षात घेऊन बुधवारी मध्यरात्री थेट मुंबई गाठली. मुंबईत येताच घरी न जाता मिलिंद नार्वेकर यांच्या निवासस्थानी पोहोचलो. त्याच्या निवासस्थानी विश्रांती केली."

"शिवसेनेतील एका बड्या नेत्याने मला पुन्हा आपल्या पक्षात नेण्यासाठी आणि पळवण्यासाठी प्रयत्न केला होता. मात्र, त्यांना चकवा देऊन मी तुळजापूर गाठले," असा दावा देखील सरिता म्हस्के यांनी लोकसत्ता या वृत्तपत्राशी बोलताना केले.

मध्यरात्री मिलिंद नार्वेकर यांच्या घरी विश्रांती घेतल्यानंतर, आज सरिता म्हस्के यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यानंतर त्या स्वतः कोकण भवन येथे जाऊन अधिकृतपणे आपल्या गटाची नोंदणी करतील. सरिता म्हस्के यांच्या पुनरागमनामुळे ठाकरे गटाला मोठा दिलासा मिळाला आहे

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ जानेवारी २०२६


## श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व गुणवंत गौरव उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन "शिवम हॉल" छत्रपती नगर बीडबायपास छत्रपती संभाजीनगर.येथे दिनांक २१ जानेवारी २०२६ वार बुधवार रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरे झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे सरचिटणीस मा.श्री बप्पासाहेब जाधव पाटील, श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष मा.श्री राजेश जाधव पाटील (दादासाहेब), भाजप प्रदेश सचिव व श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री किरण पाटील (भैय्यासाहेब), नवनिर्वाचित नगरसेवक श्री आप्पासाहेब हिवाळे पाटील, एसएससी बोर्ड मा.सदस्य श्री तात्यासाहेब गोंडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्री अरुण भाऊ हिवाळे, श्री संतोष भाऊ हिवाळे, श्री कैलासजी चव्हाण श्रीमती वडोदे ताई यांची उपस्थिती होती. यानंतर झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा गुणगौरव सत्कार करण्यात आला.मेड, ट्रॉफी पुष्पहार,नारळ देऊन सत्कार करण्यात आला. खालील स्पर्धा परीक्षा मध्ये सहभागी गुणवंत विद्यार्थी (इयत्ता पाचवी , आठवी स्कॉलरशिप) 1) हर्षदा बळीराम राठोड - 5वी 2)आरुष विकास चव्हाण - 5वी 1) पुनम रविकुमार गायकवाड - 8वीNSSE Exam (नॅशनल स्कॉलर सर्च एक्झाम) 1)अश्विन रामेश्वर चव्हाण - 3री 2) ऋतुजा अजिनाथ शिंदे - 3री 3) विराज धनंजय दारुंटे - 4 थी 4) सई कृष्णा जाधव - 4 थी 5)आदित्य गणेश शिंदे - 5 वी ( SSC exam ) प्रथम क्र. - वरद गोविंद पाटोदकर द्वितीय क्र. - ओम पुंजाराम घाटूळ तृतीय क्र. - उरूपी गणेश शिंदे (चित्रकला स्पर्धा इंटरमिजिएट) 1)नैना अशोक पायके - 9वी 2) ओम परमेश्वर चव्हाण - 9 वी3) सार्थक सतीश धनेधर चित्रकला एलिमेंटरी ग्रेड परीक्षाविद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलांना वाव देऊन एकापेक्षा एक सरस वैविध्यपूर्ण गीतांवर नृत्य सादर केले आणि उपस्थित मान्यवरांची व पालकांची मने जिंकले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री घुले सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री गावंडे सर, श्री भोसले सर, श्रीमती पवार मॅडम, श्री शिंदे सर, श्री पडवाल सर, श्री खैरे सर, श्री मनगटे सर, श्री गायकवाड सर, श्री जुंबडे सर, श्री धनवे सर, श्रीमती वानखेडे मॅडम,श्रीमती बोरुडे मॅडम, श्री राजू बारसे, श्री एकनाथ बोडखे, श्रीमती जाधव मावशी यांनी परिश्रम घेतले.

## सरकारी शाळाच आपली बरी

इंग्रजी शाळेने शिक्षणाचा,
आज मांडलाय बाजार.
खाजगी शाळेचे सर्वांना,
सारखाच झालाय आजार.

ज्या शाळेत शिकले स्वतः,
त्या शाळेला विसरून गेले.
दिखाव्याच्या नादी लागून,
मातृभाषेपासून वंचित केले.

माय मराठीचा दुधाळ पान्हा,
असा कसा रे आटून गेला.
इंग्रजी शाळेची फी भरता,
बाप कर्जाच्या ओझ्याने मेला.

मोफत मराठी शिक्षण देणारी,
सरकारी शाळाच आपली बरी.
मातृभाषेतून शिकवून
मुलांवर,
मूल्य संस्कार रुजविते खरी.

मातृभाषेच्या संवर्धनासाठी,
मराठीत लिहा मराठीत बोला.
अन्याय होता मराठी भाषेवर,
विसरू नका द्यायला टोला.

**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## इतभर पोटासाठी..

त्याचे
आकाशाला गवसणी घालणारे हात
बांधले गेले भुकेच्या साखळदंडांनी
कचकटून ..
इतभर पोटासाठी कायमचे..

त्याच्या
क्षितिजापार जाणाऱ्या नजरेवर
लावला चष्मा काळोखाचा
त्याला उजेड दिसू नये म्हणून..

आता
तो राबत आहे घरासाठी
घरातील चिमण्या पाखरांसाठी
उसनं बळ आणुन..

आता
हरवून गेल्या आहेत वाटा
जगण्याच्या..जिंकण्याच्या
तरीही तो लढतो आहे
नव्या वाटा शोधतो आहे..



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

## वसंतराव नाईक महाविद्यालयाकडून मुकुंदवाडी शाळेतील गुणवंतांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** वसंतराव नाईक महाविद्यालयातर्फे स्व. डॉ. विभावरी राठोड यांच्या स्मृती प्रित्यर्थ इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी सामान्य ज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेत इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय सहभाग लाभला.परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे सन्मानित करण्यात आले.प्रथम क्रमांक – कृष्णा साईनाथ निवारे,द्वितीय क्रमांक – आशिष प्रभाकर रगडे,तृतीय क्रमांक – राहुल सिताराम गवईयांना ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.तसेच इयत्ता दहावीतील एकूण ५६ विद्यार्थ्यांना परीक्षेत सहभागी झाल्याबद्दल ट्रान्सपरंट पॅड व पाऊच देण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रा. विवेकानंद थोरमोटे (वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.हा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमास सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## वैदर्भीय नाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या राज्यस्तरीय पुरस्काराने राजू नागरगोजे सन्मानित



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कारंजा येथील वैदर्भीय ना चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहात कारंजा येथील महेश भवन सभागृहात पार पडले यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेवापूर तालुका जळकोट येथील शिक्षक श्री राजू नागरगोजे सरांना मौलाना अब्दुल कलाम राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने कारंजा/मानोरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सई ताई डहाके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले या दिमागदार सोहळ्याचे उद्घाटन कारंजा मानोरा विधानसभा क्षेत्राचे आमदार माननीय सहित प्रकाश दादा डहाके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी संस्थापक अध्यक्ष व सचिव एकनाथ दादा पवार व पूनम एकनाथ पवार , डॉक्टर पंकज काटोले पुंडलिक गोसावी विजय तेलगोटे शारदाताई भुयार, आशाताई मेश्राम ज्योतिषाचार्य सागर महाराज देशमुख आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते शेवटी आभार पुंडलिक गोसावी सरांनी मांडले.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ जानेवारी २०२६


## जैविकतंत्रज्ञान क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी! - शास्त्रज्ञ डॉ. सचिन घरत



**पाटोदा (प्रतिनिधी) :** जागतिकीकरणात जैविकतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रात भरपूर संधी निर्माण झाल्या आहेत.असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे भूमीपुत्र तथा इस्त्राईल येथिल आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित "करिअर इन बायोटेक्लॉजी फिल्ड "या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की 20व्या शतकात जैविकतंत्रज्ञानाचा उदय झाला व अतिशय वेगाने विकास झाला आज जागतिक स्तरावरील सर्वच देशात सर्व क्षेत्रात जैविकतंत्रज्ञाना वापर केला जात आहे.शेती,बी- बियाणे,मेडिकल क्षेत्रात जैविकतंत्रज्ञान ही गरज निर्माण झाली आहे.तेव्हा युवकानी करिअर साठी जैविकतंत्रज्ञान क्षेत्रात जावे भरपूर संधी आहेत.असे अहवान केले.तसेच संशोधन क्षेत्रात ही भरपुर वाव आहे हे त्यांनी पीपीटी च्या आधारे अतिशय सोप्या भाषेत माहिती सांगितली.या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक व कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांची उपस्थिती होती.पाहुण्यांचा परिचय व प्रस्ताविक वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.बाळासाहेब जोशी यांनी केले.तर प्रा.विनोद किर्दक व प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी जैविकतंत्रज्ञान ही काळाजी गरज असल्याचे सांगितले.तर प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की जैविकतंत्रज्ञान या महत्वाच्या विषयासंबधी विद्यार्थांना ज्ञान मिळावे व त्या क्षेत्रातील एक संशोधक यांच्याबरोबर विद्यार्थ्यांना चर्चा करता यावी म्हणुन या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.तसेच आपल्या जिल्ह्याचे भूमीपुत्र इस्त्राईल सारख्या प्रगत देशात संशोधक म्हणुन काम करतात .याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे.असे सांगुन या क्षेत्रात करिअर करावे असे विद्यार्थ्यांना अहवान केले.या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा.शिवाजी भोरे यांनी केले.तर आभार प्रा.आनंद भगत यांनी व्यक्त केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.ही एक दिवसीय कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन समिती व प्रा. डॉ.बंडू लोखंडे,प्रा.डॉ. अशोक देवगुडे,प्रा.डॉ. गोविंद बामदळे,प्रा.शेख खैसर ,प्रा.बजरंग डिसले प्रा.नारायण फुन्ने,प्रा.पापाजी चव्हाण व ग्रथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी अथक परिश्रम घेतले.या कार्यशाळेचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.

## मकरसंक्रांतीचा उत्सव शिखरावर : औराळयात प्रथमच भव्य हळदी-कुंकू व 'होम मिनिस्टर'चा रंगतदार सोहळा




**औराळा :** मकरसंक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त औराळा परिसरात महिलांसाठी खास असा भव्य हळदी-कुंकू व 'होम मिनिस्टर' कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाबाबत परिसरात मोठा उत्साह निर्माण झाला आहे. राधा गोविंद शिक्षण प्रसारक मंडळ, औराळा संचलित आर. जी. ग्रुप ऑफ एज्युकेशन, औराळा (स्कूल, कॉलेज, फार्मसी व पॉलिटेक्निक) यांच्या वतीने या देखण्या व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.महिलांच्या आवडीचा आणि अत्यंत लोकप्रिय असलेला 'होम मिनिस्टर' हा खेळ या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. 'खेळ पैठणीचा... मान-सन्मान नारीशक्तीचा!' या संकल्पनेवर आधारित या खेळातून महिलांचे कौशल्य, आत्मविश्वास, हुशारी व व्यक्तिमत्त्व प्रकट होणार आहे. या खेळाचे निवेदन सुप्रसिद्ध विनोदी कलाकार व प्रभावी निवेदक संदीप जाधव करणार असून त्यांच्या विनोदी, उत्साही व रसाळ शैलीमुळे कार्यक्रम अधिकच रंगतदार होणार आहे.या कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक खेळ, सहभागात्मक उपक्रम, प्रश्नोत्तरे तसेच विजेत्या व सहभागी महिलांसाठी आकर्षक व उपयुक्त बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. घरगुती वापरातील साहित्य, आकर्षक भेटवस्तू आणि सन्मानचिन्हे यामुळे महिलांसाठी हा कार्यक्रम आनंददायी व संस्मरणीय ठरणार आहे. प्रत्येक महिलेला सन्मानाची व आनंदाची अनुभूती देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.सदर हळदी-कुंकू व होम मिनिस्टर कार्यक्रम सोमवार, दि. 26 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 4.00 ते 8.00 या वेळेत आर. जी. ग्रुप ऑफ एज्युकेशन कॅम्पस, गट नं. 18, जवळी रोड, औराळा, ता. कन्नड येथे संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे मार्गदर्शक श्री. विकास गुलाबराव जिवरख, संचालिका सौ. गीता विकासराव जिवरख यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील सर्व पदाधिकारी, शिक्षक व कर्मचारी वर्ग परिश्रम घेत आहेत. मकरसंक्रांतीनिमित्त महिलांसाठी सन्मान, आनंद व मनोरंजनाचा सुंदर संगम असलेल्या या कार्यक्रमाला औराळा व परिसरातील सर्व माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## किनगाव राजा येथील जिल्हा परिषद शाळा समितीच्या अध्यक्षपदी इसाक कुरेशी, उपाध्यक्षपदी राज्य विशाल राजे जाधव यांची निवड




**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा येथील जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी इसाक कुरेशी यांची तर उपाध्यक्षपदी राज्यश्री विशाल राजे जाधव यांची निवड करण्यात आली. ही निवड दिनांक २२ जानेवारी गुरुवार रोजी पडलेल्या समितीच्या बैठकीत करण्यात आली.या निवडीवेळी शाळेचे मुख्याध्यापक,केंद्र प्रमुख घुगे सर शिक्षकवृंद , समितीचे सदस्य तसेच पालक उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले.यावेळी बोलताना इसाक कुरेशी यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी तसेच शाळेतील सोयी-सुविधा सुधारण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. इसाक कुरेशी हे सामाजिक कार्यकर्ते असून हे पत्रकार असून यांना नेहमी सामाजिक बांधिलकी असून, शैक्षणिक व सेवाभावी कार्यात सक्रिय असून त्यांचा अनुभव शाळेच्या विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल,निवडीनंतर बोलताना अध्यक्ष इसाक कुरेशी यांनी शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे, डिजिटल शिक्षणाला चालना देणे, तसेच शाळेच्या भौतिक सुविधा मजबूत करण्यासाठी प्रशासन, शिक्षक व पालक यांच्यात समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.या नव्या नेतृत्वामुळे किनगाव राजा येथील जिल्हा परिषद शाळेच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाला निश्चितच गती मिळेल, असा विश्वास शिक्षकवर्ग व पालकांनी व्यक्त केला आहे.


**दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.**

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ जानेवारी २०२६

# कन्नड शाळेत आनंद नगरीतून व्यावहारिक ज्ञानाचे धडे



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कन्नड नं १ मराठी व कन्नड नं ३ शाळेत विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञान विकासासाठी राबविण्यात आलेला 'आनंदनगरी' हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थीच ग्राहक अन विद्यार्थीच विक्रेते बनल्याचा आगळावेगळा व्यावहारिक ज्ञानाचा अनुभव यावेळी सर्वांनी घेतला. गटशिक्षणाधिकारी सबाहत नईमोद्दीन, शिक्षण विस्तार अधिकारी मनिष दिवेकर केंद्र प्रमुख बाजीराव ताठे यांच्या मार्गदर्शनाखाली जि प प्रशाला कन्नडचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड यांनी फित कापून त्यांच्या हस्ते आनंदनगरीचे उद्घाटन करण्यात आले.या उपक्रमात शाळेचे संपूर्ण प्रांगण आनंद,सर्जनशीलता व उत्साहाने फुलून गेले होते. 'आनंदनगरी' अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थ्यांचे दुकाने थाटली होती. समोसा, भजे, वडापाव, सॅन्डविच, चहा, मटकी, चना, रानमेवा, पाणीपुरी, कचोरी, हैदराबादी शरबत,ढोकळा आदी सह अनेक खाद्य पदार्थांचा आस्वाद विद्यार्थ्यांबरोबरच, पालक व शिक्षकांनी घेतला. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तूंची विक्री करत व्यवहारज्ञान, व्यवस्थापन कौशल्य, संघभावना, आत्मविश्वास , नेतृत्वगुण, सर्जनशीलता वाढीस लागतो. यांचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. या उपक्रमाचे उद्घाटन जि प प्रशालेचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी केंद्र मुख्याध्यापक अकबर अन्सारी आयोजक शाळा कन्नड नं १ चे मुख्याध्यापक सतिश कोळी,जेष्ठ शिक्षिका कल्पना सूर्यवंशी, कन्नड नं ३ चे मुख्याध्यापक संजीवकुमार सोनवणे, सुवर्णा गायके, कन्नड नं १ उर्दू च्या राहत कादरी,फरहीन पठाण, चित्रकला शिक्षक धर्मराज खैरणार,पल्लवी गायकवाड, वसुंधरा दाबके,राहूल डुकरे, संजय चव्हाण,मोहंमद खान, करण राठोड, अरविंद पदमे आदी शिक्षकवृंद विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो तसेच शिक्षणासोबत जीवनकौशल्ये विकसित होण्यास मदत होते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.सुवर्णा गायके यांनी स्वागत तर,सतिश कोळी यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# वाचनसंस्कृती हा संस्काराचा भाग - डॉ. अनिल काळदाते



**उमरगा :** गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सभागृहात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने आयोजित व्याख्यानमालेत "ग्रंथ परीक्षण " या विषयावर ते बोलत होते, यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.किसन लोहार हे उपस्थित होते .डॉ.अनिल उर्फ बापूसाहेब कळदाते पुढे म्हणाले की, आज वाचन संस्कृती जवळपास संपुष्टात आलेली आहे, नवीन तंत्रज्ञान आणि मोबाईलचा अतिवापर यामुळे विद्यार्थ्यांमध्येच काय परंतु प्रत्येक माणसांमध्ये वाचनाची जी सवय होती ,ती सवय जवळपास आज लुप्त होण्याच्या मार्गावर आहे .पाहणे आणि ऐकणे यावर लोकांचा जास्त भर आहे .विद्यार्थ्यांना सुद्धा मोबाईलचे वेड लागले असून ए.आय.यासारख्या अनेक ॲपचा वापर करून आपण आपल्या विविध बुद्धी कौशल्याचा जणू काही आपल्याला विसर पडलेला आहे असे आजचे चित्र आहे.कृत्रिम रित्या निर्माण झालेली आभासी पोकळी, येणाऱ्या पिढीला कुठे घेऊन जाईल हे सांगता येणे आज घडीला कठीण असले तरी ,कधी ना कधी पुन्हा आपल्याला वाचन संस्कृतीकडेच वळावे लागेल. वाचन संस्कृती हीच ज्ञानाची मुख्य वाहिनी असून त्याच्याशिवाय इतर सर्व कृत्रिम बुद्धी कौशल्य आपल्याला स्थायी व चिरंतन बुद्धी कौशल्य विकसित करण्यात असमर्थ ठरतील .वाचन संस्कृती असेल तरच ग्रंथ परीक्षण होईल. ग्रंथाचा परिचय करून घेणे, ग्रंथाची ओळख करून घेणे ,ग्रंथ वाचणे ही सबंध एक प्रक्रिया आहे. तो एक संस्कार आहे. या संस्कारातूनच पुन्हा एकदा विद्यार्थी आणि आपण सर्व वाचन संस्कृतीकडे वळू शकतो. वाचन संस्कृती मधूनच आपल्याला ग्रंथाचे परीक्षण करता येईल .ग्रंथामुळे आपल्या ज्ञानामध्ये भर पडेल. नवनवीन गोष्टी आणि अनुभव त्याचबरोबर पुस्तकातून मिळालेली अनुभूती, आपल्याला जगण्यास समर्थ बनवेल.आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये प्रगल्भता आणि समृद्धता आणेल यात मला तरी काही संशय वाटत नाही.डॉ.आशिया चिश्ती यांनी आपल्या प्रास्ताविकात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त घेत असलेल्या विविध स्पर्धा व उपक्रमाची माहिती देत या सर्व उपक्रमांचे प्रयोजन सांगितले.अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून ,यापुढे आयोजित केलेल्या विविध व्याख्यानाचा विद्यार्थ्यांनी आवर्जून लाभ घेण्याचे आवाहन केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.किसन लोहार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवनवीन तंत्रज्ञानामुळे माणूस कसा पुस्तकापासून दूर जात आहे याचे विविध दाखले देत, आपल्याला जर सखोल ज्ञान प्राप्त करावयाचे असेल, संदर्भासह मूळ शोधायचे असेल तर ग्रंथाशिवाय पर्याय नाही.,असे सांगून तंत्रज्ञानाचा विस्फोट आपल्याला कुठे घेऊन जाईल हे जरी आज सांगता येत नसले तरी ग्रंथ हे कायमस्वरूपी ज्ञानाचे स्त्रोत राहतील एवढे मात्र खरे असे प्रतिपादन केले आणि विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा ग्रंथांना आपले मित्र बनविण्याचे आवाहन करून आपला अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. विनोद धनेराव यांनी केले तर कार्यक्रमाचे रीतसर आभार मराठीच्या प्रा. डॉ. मेघा जोशी यांनी केले .पसायदानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# फॅसिझमचा लोकशाही मार्ग

हे राजकारण नाही,
हा सत्तेचा आजार आहे—
लोकशाहीच्या शरीरात
हळूहळू पसरत जाणारी
फॅसिझमची विषवल्ली आहे !

संविधान हातात,
आणि बूट मानेवर—
ही कुठली लोकशाही?
कायद्याच्या नावाखाली
केलेली शिस्तबद्ध कत्तलच!

कथन, कथन, कथन—
इतकं खोटं
की सत्यालाच स्वतःच लाज वाटावी,
इतकं ओरडणं
की प्रश्न गुदमरून मरावा!

एक नेता, एक भाषा,
एक धर्म, एक विचार—
इतिहासाला गोळ्या,
भविष्याला बेड्या,
आणि वर्तमानावर
भीतीचं राज्य!

फॅसिझम असाच येतो—
टँकवर नाही,
तर निवडणुकीतून,
मतपेटीच्या आडून
मेंदूत विष पेरून!

न्याय वाकतो तणावाखाली,
संस्था वाकतात,
माध्यमं रांगतात—
आणि प्रश्न विचारणारा
थेट देशद्रोही ठरतो!

ईडी, सीबीआय, आयबी—
हे लोकशाहीचे रक्षक नव्हेत;
हे तर सत्तेचे लोखंडी पंजे,
जे फक्त
विरोधकांच्या गळ्यावर
घट्ट बसतात!

"सबका साथ" चा नारा—
पण साथ फक्त भांडवलदारांची,
विकास फक्त मुठभराचा,
आणि राष्ट्र हिंस्रतेचं!

श्रमिकांसाठी तुरुंग,
शेतकऱ्यांसाठी कर्ज,
दलितांसाठी लाठी,
आदिवासींसाठी गोळी—
आणि सत्ताधाऱ्यांसाठी
सत्तेचा मलिदा!

हा राष्ट्रवाद नाही,
ही सामूहिक उन्मादाची
राजकीय फसवणूक आहे—
जिथे माणूस नाही,
फक्त ओळख आहे—
आणि ओळख
सतत तपासली जाते!

पण लक्षात ठेवा—
इतिहास फॅसिस्टांना
कधीच माफ करत नाही;
लोकशाहीचा मुखवटा
कितीही झगमगता असो,
शेवटी तो उतरतोच!

कारण फॅसिझम
भीतीवर उभा असतो -
आणि भीतीचा एक नियम असतो:
ती कधीतरी धैर्यात बदलते!

आणि ज्या दिवशी
जनता प्रश्न विचारते—
त्या दिवशी
फॅसिझमचा अंत लिहिला जातो!

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

# सावल्या

गेल्या कलत सावल्या
गेलं अंबर झाकाळूनं
आठवणीची मनं लाटं
लाट उसळे परतूनं

जातं धुळीत माखले
घरदार कोसळले
तुळशी वृंदावन माय
भेगा चिऱ्यात निखळले

मन धावते भेटावया
वर आभाळ फाटले
निवडुंगाच्या काट्यावर
तन मन रक्ताळले.

वडं कोसळला बाप
माय सावली निखळली
भाऊ-बहीण मागे मागे
आनंतातं लुप्त झाली.

हुंदक्या मागून हुंदके
आसवाणी दिली वाट
परतुनी मायबापा
झाली भावंडाची ताटातूटं

**भूमिपुत्र वाघ**

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ जानेवारी २०२६


## नेत्यांची दमछाक, इच्छुकांच्या कोलांट उड्या तर महायुतीत मीठाचा खडा



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकी साठी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटच्या दिवशी उपविभागीय अधिकारी कार्यालयास अक्षरशः यात्रेचे स्वरुप आले होते. पक्षांचा बी फार्म मिळविण्यासाठी उमेदवारांची धावपळ तर फोडाफोडी टाळण्यासाठी नेत्यांची चांगलीच दमछाक झाली. युती आघाडी पक्ष निष्ठा सर्व बाजूला ठेवत फक्त अधिकृत उमेदवारी साठी इच्छुकांनी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात क्षणार्धात उड्या मारल्या. त्यामुळे कोणता उमेदवार कोणाकडे हे नेत्यांनाच उमजेनासे झाले. शिवसेना भाजप ची युती झाल्याची घोषणा झाल्याचे वरिष्ठ नेत्यांनी जाहिर केले असतानाच एका भाजप इच्छुकाने शिवसेने च्या जागेवर बी फार्म सह अर्ज दाखल केल्याने, मीठाचा खडा पडला आणि मग शिवसेना इच्छुकांनी ही मित्र पक्षाच्या वाट्याला गेलेल्या जागांवर ही धडाधड बी फार्म सह अर्ज दाखल केल्याने या युतीत गोंधळ उडाला. शिवसेना भाजप च्या उमेदवारी ची संधी हुकल्याने वजनदार उमेदवारांनी आप आपली रुमाले फेकत राष्ट्रवादी व इतर पक्षांची उमेदवारी मिळवित मैदानात उडी घेतली. दिवसभर चाललेला हा गोंधळ रात्री उशीरा पर्यंत सुरुच होता.चौकट_ उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसा पर्यंत एकुण दाखल उमेदवारी अर्जजिल्हा परिषद गट निहाय प्राप्त अर्ज:- नागद- २३, करंजखेडा- १९, चिंचोली लिंबाजी- २०, पिशोर- २१, कुंजखेडा- १२, हतनूर- १५, जेहूर- ११, देवगाव रंगारी- १२, एकुण प्राप्त अर्ज- १३३पंचायत समिती गण:- नागद- २०, अंधानेर- १८, करंजखेडा- १८, घाटशेंद्रा- १२, चिंचोली लिंबाजी- १६, नाचनवेल- १२, पिशोर- ०७, निंभोरा- १७, कुंजखेडा- २०, चिकलठाण- १५, हतनूर- १६, चापानेर- ११, जेहूर- ०६, औराळा- २१, देवगाव रंगारी- २१, ताडपिंपळगाव- १३, एकुण प्राप्त अर्ज- २४३ दाखल झालेय.

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात गुणवंत गौरव व वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे गुणवंत गौरव व वार्षिक स्नेहसंमेलना चा पारितोषिक वितरण सोहळा शनिवार दिनांक १७/०१/२०२६ रोजी तापडिया नाट्य मंदिर येथे संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. ॲड. डॉ. कल्पलता पाटील - भारस्वाडकर मॅडम (अध्यक्ष - मराठवाडा लिगल ऍण्ड जनरल एज्युकेशन सोसायटी) होत्या. या कार्यक्रमाचे विशेष अतिथी सुप्रसिद्ध सिने कलावंत श्रीश्याम राजपूत हे होते.या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्या डॉ.सुनीता बाजपाई मॅडम, स्नेह संमेलन समिती प्रमुख प्रा. डॉ. पराग चौधरी ,संसद प्रमुख प्रा.डॉ.सुनंदा चक्रनारायण, कनिष्ठ महाविद्यालय पर्यवेक्षक प्रा.माधुरी भावसार आणि ' मनोवेध ' समुपदेशन केंद्राच्या समुपदेशक डॉ.मधुरा अन्वीकर यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रजनी सेनाड यांनी महाविद्यालयात स्थापन झालेल्या समुपदेशन केंद्र ' मनोवेध' बद्दल माहिती दिली . डॉ. मधुरा अन्वीकर यांनी मना चे आरोग्य किती महत्वाचे आहे हे सांगितलं .या प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.स्नेहसंमेलनाचे प्रमुख प्रा डॉ.पराग चौधरी यांनी स्नेह संमेलनाचा अहवाल सादर केला. प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध अभिनेते मा. श्री. श्याम राजपूत यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की माझी करियर ची सुरुवात तापडिया नाट्य मंदिर येथूनच झाली मला तापडिया नाट्य मंदिरात आल्यावर मुलीला माहेरी आल्यावर जसा आनंद होतो,आज मला तसाच आनंद होत आहे.माझ्यातील वेगळेपण म्हणजे मी माझ्या अहिराणी बोलीत काम करण्याचं धाडस केले आणि यशस्वी वाटचाल सुरू झाली. मातीशी घट्ट नाते जोडून ठेवले पाहिजे .मराठी भाषा समृध्द भाषा आहे .मराठीत अनेक बोली आहे.आपण आपली भाषा समृध्द केली पाहिजे.माझ्या जीवनात माझ्या वाटचालीत माझ्या आई,पत्नी, माझ्या मैत्रिणी चा वाटा आहे. सर्वच स्त्रियांन बद्दल चा आदर त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे अध्यक्ष मा .ॲड. कल्पलता पाटील भारस्वाडकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .विद्यार्थ्यांना आपल्या दिशा ठरवण्यात काही अडचणी आल्यास आपले महाविद्यालय व प्राध्यापक आहेत .तुमच्या पंखात बळ निर्माण करण्याचं काम इथे केले जाते. तुम्ही फक्त स्वतःच्या पंखांवर विश्वास ठेवा .असे विद्यार्थ्यांना सांगितलेया कार्यक्रमात नामांकित व गौरवांकित पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.यात बेस्ट स्टूडेंट पुरस्कार कला विभागातील बी.ए.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी , अनुजा काळे.वाणिज्य विभागातून तृतीय वर्षाची विद्यार्थिनी श्रुती विजय भंवर बी.सी. ए. विभागातून तृतीय वर्षाची विद्यार्थिनी रेणुका मंचकराव सावंत , यांना देण्यात आली. बेस्ट स्टुडन्ट एनएसएस नयन देशपांडे रीडर आचल साळवे उत्कृष्ट खेळाडू वरिष्ठ महाविद्यालयातील पूजा बागडे कनिष्ठ महाविद्यालयातून सोनवणे नचिकेत बारावी विज्ञान शाखेतून पुणे सृष्टी हिला सन्मानित करण्यात आलेविविध अंतर महाविद्यालयीन तसेच राज्य व देश पातळीवर झालेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. मानाची समजली जाणारी मिस आय बीपी या स्पर्धेमध्ये कु. ईशानी कुलकर्णी हिस मिस आय बी पी म्हणून सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुषमा देशपांडे ,गुणवंत गौरव पुरस्काराचे वाचन प्रा .अश्विनी शहाणे, क्रीडा स्पर्धा पुरस्काराचे वाचन डॉ. दिलीप दोडके, स्नेहसंमेलनाचे पारितोषकाचे वाचन प्रा. त्रिपती वरपडे यांनी केले. प्रा पूजा दीक्षित यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर आभार प्रगटन संसद प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी केले या कार्यक्रमासाठी पालक, प्राध्यापक, विद्यार्थी ,विद्यार्थिनी ,शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ जानेवारी २०२६

# ग्रामीण जीवन समृद्ध करणारा कथासंग्रह : आमचं मत आम्हालाच




डॉ. नारायण शिवशेट्टेपानसरे महाविद्यालय अर्जापूरभ्र. ९४२२५५८५७३

प्रा. डॉ. माधव जाधव यांचा 'आमचं मत आम्हांलाच' हा कथासंग्रह नांदेड येथील सायास पब्लिकेशन यांनी प्रकाशित केला आहे. यापूर्वी प्रा. माधव जाधव यांचा 'चिन्हांकित यादीतील माणसं' हा कथासंग्रह प्रकाशित झालेला असून त्यांच्या कथा लेखनातून ग्रामीण जीवन जाणीवा, ग्रामीण भागातील जनजीवन , वास्तविकता, ग्रामीण जीवनाची विविध कंगोरे अतिशय प्रखरतेने शब्दबद्ध झाले आहेत. 'मला लेखनासाठी प्रवृत्त करणाऱ्या या कथासंग्रहातील पात्रांच्या सक्षम इच्छाशक्तीस' अशा शब्दांत कथासंग्रहाची अर्पण पत्रिका दुर्दम्य आशावाद व्यक्त करणारी आहे. कथासंग्रहाचे मुखपृष्ठ व आकर्षक मांडणी विजय चित्तरवाड यांची तर कथेचा सारांश अगदी चपखलपणे आपल्या कुंचल्यातून साकारणारे चित्रकार सुनील यावलीकर यांनी कथासंग्रहातील रेखाटने रेखाटली आहेत. लेखक प्रा. माधव जाधव हे आपल्या लेखननिर्मिती विषयी लिहितात, ' मी ज्या अल्पभूधारक शेतकऱ्याचा आणि शेतमजुराचा प्रतिनिधी आहे. त्यांच्या या कहाण्या आहेत, यातील पात्रे समकाळातीलच वेगवेगळ्या समूहगटांचे प्रतिनिधी आहेत. आपल्या माणसांना त्यांच्या भावभावनांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांचं म्हणणं सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी केवळ कथा हे माध्यम निवडले आहे.' प्रस्तुत कथासंग्रहाला दिलेल्या पाठराखणीतून लेखकाच्या वेगळेपणाविषयी प्रा. डॉ. रणधीर शिंदे म्हणतात, ' मराठीतील बव्हंशी ग्रामीण कथाकार भूतकाळात रमतात, चुकीच्या रुढींचे छुपे गौरवीकरण करतात या पार्श्वभूमीवर जाधव यांच्या कथेत परंपरेतील अनाठायी गोष्टीबद्दल नकाराचा सूर आहे. त्यांचा कथाचित्रणप्रदेश हा आधुनिक मूल्यदृष्टीचा आहे. प्रागतिक दृष्टीच्या स्वर या कथेस लाभला आहे. त्यामुळे ही कथा बदलाला सामोरे जाणारी आहे.' असा आशयपूर्ण विचार शब्दबद्ध होतो. 'आमचं मत आम्हालाच' या कथासंग्रहात 'सपन', 'धुऱ्याचा धाक', 'चाकं', 'प्रतिनिधी', 'आमचं मत आम्हालाच', 'तिची परीक्षा', 'चूलबंद', 'ब्रेकिंग न्यूज', 'सदा सर्वकाळ', 'कीड', 'चलगत','उखाड रामा', 'जग्गू अंकल' अशा तेरा कथांचा समावेश आहे. कथासंग्रहातील सर्वच कथांमधून वेगवेगळ्या पात्रांची ओळख अतिशय प्रभावीपणे आपल्याला होते. कथा हे आपल्या सभोवतालात वावरणाऱ्या माणसांच्या स्वभाव विषयाची प्रतिबिंब चित्रित करणारे आहेत.

या कथांमध्ये व्यक्त होणारा आशय वास्तविक व जिवंतपणाने आलेला आहे, याची प्रचिती आपणास कथा वाचताना येते. म्हणूनच या सर्व कथा ग्रामीण जीवनाशी निगडित विविध जीवनानुभवाच्या प्रसंगाचे रेखाटन अतिशय प्रभावीपणे करणाऱ्या आहेत. या कथासंग्रहातील पहिलीच कथा 'सपन' ही आपल्याला घेऊन जाते थेट आपल्या मनातील गावात. भावा भावांच्या वादासाठी खास करून प्रसिद्ध असलेले गाव या कथेत मात्र जिव्हाळ्याचा झुळझुळता झरा होऊन आपल्या मनामध्ये उतरते. दोन भावांच्या भावनात्मक गुंतागुंतीची ही कथा आपल्याला बरेच काही सांगून आणि शिकवून जाते. ' भयड्या मास्तर झाला, भयड्या मास्तर झाला' या आनंदाने भारावून गावाला पेढे वाटणाऱ्या विजू नोकरीचा पहिला पगार आई-बाबांच्या हातात देताना त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. याच आनंदाला गावातले काड्याखोर कधी कधी त्याला फुस लावायचे. म्हणायचे, 'तू मातीत मळतू. तुव्हा भाऊ बघ तुझ्या जीवावर ऐश करते तिकडं. किती पागल आहे तू.' असा विरोधी सूर असला तरी, 'नशिबानं घ्येवावं लागते. मला काय कमी हाय. कव्हा मला नाही म्हणते का भयड्या.' (पृ.१३) भावा-भावामध्ये प्रेम आणि जबाबदारीची जाणीव करून देणारी ही कथा आहे. 'धुऱ्याचा धाक' या कथेत घडणारे कथानक हे प्रत्येक गावात जाणवते. शेजाऱ्याचे बांध कोरून समाधान मानणाऱ्या अनेक स्वार्थी प्रवृत्तीची माणसे गावोगावी दिसून येतात. या कथेतून आलेले केरबा तात्या, संभा आणि दौलती ह्या व्यक्तिरेखा चित्रीत होतात. केरबा तात्यासारखा प्रामाणिक माणूस आणि दौलतीसारखा वाईट प्रवृत्तीचा दुसऱ्यांना धाकात ठेवणारा आपलच वर्चस्व कसे गावावर राहील यासाठी सतत गुंड प्रवृत्तीने, माज चढलेला, गरिबांना छळणारा वाईट प्रवृत्तीचा दिसून येतो. दौलतीच्या या प्रवृत्तीविरुद्ध न्यायासाठी लढा देणारा केरबा तात्या ही भाऊबंदकीचे स्वभाव नाट्य प्रस्तुत कथेतून आलेले आहेत. 'गांडमनीचं लईच तरास देवाला ब्वा संभा.' (पृ. २२) , 'आभळाकीचं धन कोणाला पचत नाही तसं हाय दौलती.'( पृ. २३) केरबा तात्या भावनिक साद घालत धुऱ्याकडं पाहातच म्हणायचा, ' मी समजू शकतो तुही दशा... गेल्या अनेक वर्सापासून तुला इजा व्हतेय... तुझे साल्टं निघतात... हाडं उघडे पडतात... इजा व्हवू नये म्हणून तू सारखा सरकत आहेस... पण नक्की एक दिवस तुझा येईल... तुला कुणीही हात लावणार नाही... तू आमची इज्जत आहेस... बांध आहेस.' (पृ. २५) , शेवटी केरबातात्या हा दौलतीला अद्दल घडवतो. तो म्हणतो की, 'किती सोपी हाय युक्ती ! युक्ती लढवायला कोठं गरिबी-श्रीमंती लागते! ती तर डोस्क्यातून जल्मते अन् डोस्कं त ईश्वरानं सगळ्यायला सारखंचं दिलं.' (पृ.३०) 'चाकं' या कथेतून लेखक माधव जाधव यांनी दादाराव ही व्यक्तिरेखा अतिशय प्रभावीपणे व सकारात्मक स्वरूपात चित्रित केली आहे. कोरोनाकाळातील लॉकडाऊन लागल्यावर सर्वसामान्यांचे जीवन जगणे कसे मुश्किल झाले होते त्याचा धागा दोरा या कथेत दिसून येतो. या कथेतून दादाराव- सुमन आई-वडील, मंजुषा मुलगी व शंतनू जावई यांचे चित्रण आले आहे. ' एक दिवसाचा पाव्हणा, दोन दिवसाचा मेव्हणा अन् त्यापुढं राह्यलं तं कव्हा जातू जायना.'(पृ.३४) , घरचं झालं थोडं अन् जावयानं धाडलं घोडं. जावयाचंच घोडं येयालनं.'(पृ.३६) 'सुमनच्या मशिनवरील पायाने गती घेतली तशी दादारावच्या सायकलच्या चाकांनाही गती मिळाली होती.'(पृ.४२) असा परिवर्तनवादी विचार शब्दातून चित्रित होतो. कथेच्या शेवटी लेखक म्हणतात की ,'शिलाई मशीन आणि सायकलची चाकं गतिमान झाली होती, तशी विचारांची ही... ., (पृ.४२) अशा शब्दरचनेतून कोरोनासारख्या संकटातून मार्ग काढण्यासाठी सकारात्मक विचार प्रस्तुत कथेतून प्रतिबिंबित झालेला आहे. 'प्रतिनिधी' या कथेतून प्रा. शरद यादव व चंदनमामाची व्यक्तिरेखा चित्रित होते. प्रा. शरद यादव यांनी कोरोनाकाळात 'शेतकऱ्याचा आसूड', 'संत गाडगेबाबा चरित्र', 'अण्णा भाऊ साठे निवडक वाड्मय' हे ग्रंथ वाचून काढले. परंतु रोजच्या कानावर येणाऱ्या वेगवेगळ्या बातम्यांनी ते प्रसंगी अस्वस्थ होत असतात. तर चंदनमामाने आपली एक एकरची केळीची बाग सरकारच्या हवाली केली आहे. जे लोक रस्यात अडकले आहेत त्यांना वाटण्यासाठी. असा एक सामान्य शेतकरी आपल्या कष्टातून आणि कल्पक बुद्धीतून शेतीत नवनवे प्रयोग करतो. अन् शेतीचे नंदनवन कसे बनवतो. असा शेतकऱ्यांच्या जीवनात शेती करत असताना सकारात्मक व प्रगतिशील विचार चंदनमामाच्या व्यक्तिमत्त्वातून रुजवण्याचा प्रयत्न लेखक माधव जाधव करतात. 'या जगात कोणतं क्षेत्र कमी नाही सर... मी अख्खा महाराष्ट्र फिरतो. कधी कधी परराज्यात जातो. टीव्ही, पेपर रेडिओवरच्या शेतकऱ्यांच्या मुलाखती येतात ते ऐकतो. त्याचे पत्ते हुडकून काढतो त्यांच्या शेतीला भेट देतो. तीर्थक्षेत्राला नाही गेले तरी चालते सर ; पण आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रातल्या मोठ्या माणसाला भेटलं पाहिजे. .' (पृ.४६). असा मौलिक विचार चंदनमामाच्या व्यक्तिमत्त्वातून अधोरेखित होतो. ' जगातला कोणत्याही आत्महत्या करायला निघालेल्या शेतकऱ्यांनं आत्महत्या करण्यापूर्वी या शेतीला आणि चंदन मामाला एकदा भेटावं एवढीच अपेक्षा. .!'(पृ.४९) 'आपल्याकडे लिहिणारे राबत नाहीत आणि राबणारे लिहीत नाहीत. त्यामुळेच शेती आणि शेतकऱ्यांचे वाटोळं होत चाललं. याचा प्रतिनिधी ग्रामीण साहित्याचा नायक होत नसेल त्याचा स्वतःलाच प्रश्न...'पृ. ५०) विचारणारा चंदनमामा प्रत्येक ग्रामीण जीवन जगणाऱ्या व्यक्तींना विचार करायला भाग पाडतो. कथासंग्रहाच्या शीर्षकाची कथा -आमचं मत आम्हांलाच' प्रस्तुत कथेतून आमगाव या गावची ग्रामपंचायत निवडणुकीत इतर मागास प्रवर्गातील सुलोचना ही काहीशी निर्भीड स्वभावाची आणि परखड बोलणारी महिला विजयी होते. याचे चित्रण या कथेत आले आहे. सुलोचनाच्या सोबतीला मदत करणारी सुनंदा व शकुंतला ह्या होत्या. 'आपल्याकडे स्त्रियांचे मतदान त्या स्वतःच्या विवेक वापरून करतात हे जणू मान्यच नाही. ते कारभाऱ्याच्या मनावर होतं हे रूढ आहे. आपल्या देशातील ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये तर ही समज पक्की रुजलेली आहे. कारभाऱ्याने सांगितलेल्या उमेदवाराला घरातील सर्वांनी मतदान करायचं असा जणू अलिखित नियमच असतो. खेड्यात यावेळी तो मोडीत काढायचा असा निर्धारच या तीन स्त्रियांनी केला होता. कारणही तसचं होतं म्हणा. पुरुषप्रधान संस्कृतीत वावरणाऱ्या पुरुषांचा आणि त्याला मुकपणांनं संमती देणाऱ्या स्त्रियांचा भलता राग त्यांच्या मनात निर्माण झाला होता. त्या तिघीही विधवा होत्या.( पृ. ५३) पुरुषसत्ताक वर्चस्वाला नकार देणारा विश्वास या तिन्ही स्त्रियांच्या विचारात होता. सुनंदा आणि शकुंतला या दोन्ही मैत्रिणीच्या वाट्याला आलेले विधवापण स्त्री वेदना कथेत प्रखरपणाने आलेले आहे. आपली मतं आपल्याला पडल्यामुळेच हा विजय मिळाला. शकुंतला बोलली, यापुढे आपले मत स्वतःच्याच मनानुसार द्यायचे हा निर्धार त्यांनी केला. अशा स्त्री केंद्रित आशयाची कथा लेखकाने अतिशय प्रभावी, संवादात्मक व स्त्रीसत्ताक पद्धतीचा पुरस्कार करणारी आहे. स्त्रियांप्रती असणारा आदरभाव या कथेतून व्यक्त होतो. 'तिची परीक्षा' ही कथा कोरोना काळातील महाविद्यालयात शिकविणाऱ्या शिक्षकांची आणि शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची आहे. यासंदर्भाचे विवेचन प्रस्तुत कथेत आलेले आहे. विद्यापीठाने पदवीत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा घेण्याचे निश्चित केले होते. अर्थात ऑनलाईन या शब्दाचा अर्थ घरी बसून आपल्या मोबाईलच्या साह्याने, लॅपटॉपच्या साह्याने व कम्प्युटरच्या साह्याने परीक्षा देणे असा होतो. कोरोना महामारीने ऑनलाइन शिक्षण भलतेच गतिमान झाले होते. किती प्रभावी, फलदायी, यशस्वी हा पुढचा मुद्दा. 'तिची परीक्षा' या कथेतून कोरोना काळातील शिक्षणाक्षेत्राची झालेली अवस्था अतिशय प्रभावीपणे लेखाने चित्रित केली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण महाविद्यालयात शिकवणाऱ्या शिक्षकांची आणि शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण झाली ती कशी या कथेतून आलेली आहे.प्राध्यापक कांतराव दाढे यांनी विद्यार्थ्यांना फोनद्वारे संपर्क साधला असता त्यांना वेगळा अनुभव आला तो म्हणजे विद्यार्थिनीचा. अर्थात त्या मुलीचे लग्न होणे, दिलेला मोबाईल नंबर वडिलांचा, वडिलांशी संवादाचा मेळ न बसणे आणि मुलीचा नवरा अर्थात जावईची बोलण्याची भाषा यातून उडालेली तारांबळ हा कथेचा आशयबिंदू आहे. मुली शिकल्या की प्रगती होते. शिकलेल्या मुलीला तिचा बाप, तिचा नवरा साधा मोबाईलही देत नाही तिच्या शिक्षकांशी तिला एक वाक्यदेखील बोलू देत नाही आणि आपण तर म्हणतो शिकून समाज समृद्ध होतो ? हा प्रश्न या कथेतून अधोरेखित झालेला आहे. कथेच्या शेवटी उपहासाने प्रा. कांतराव दाढे म्हणतात, ' याला म्हणतात शाळा बंद शिक्षण चालू' मानलं ब्वा शासनाला आणि विद्यापीठाला! प्रस्तुत कथासंग्रहात आणखी काही कथा आहेत. 'चुलबंद', 'ब्रेकिंग न्यूज', 'सदा सर्वकाळ', 'कीड', 'चलगत', 'उखाड रामा', 'जगु अंकल' या सर्वच कथा ग्रामजीवनाशी संबंधित विषय आणि आशयाला चित्रित करण्याचा प्रयत्न करतात. 'चुलबंद' ही कथाही बोलकीच आहे. इथं परंपरानिष्ठ भोळा भाबडा समाज रेखाटला आहे. यात समाजाचे दरवर्षी नुकसान होत आलेले आहे. विघातक परंपरातून समाजमनाला बाहेर काढण्याचा प्रयत्न लेखकांनी ह्या कथेद्वारे केलेला आहे. 'ब्रेकिंग न्यूज' ही कथा तर मागच्या राजकीय घडामोडीवर आधारित आहे. पक्षफोडी, पळापळी, टी व्ही आणि लोकमानसिकता अशा राजकीय वास्तव परिस्थितीवरची ही कथा दमदार झाली आहे. ' प्रतिनिधी' व 'सदा सर्वकाळ' या कथांमधून शेतकऱ्याचा आसूड, संत गाडगेबाबा चरित्र, अण्णा भाऊ साठे निवडक वाड्मय' ब्राह्मणाचे कसब, तुकाराम महाराज यांची गाथा, ग्रामगीता, गाडगेबाबांचे कीर्तन अशा काही ग्रंथ, चरित्र, संतांची गाथाचा आलेला हा संदर्भ म्हणजे लेखकांचा परिवर्तनवादी दृष्टिकोन दिसून येतो. 'आमचं मत आम्हालाच' या कथासंग्रहातील भाषाशैली सरळ, साधी, सोपी तरीही अर्थपूर्ण आहे. अलंकाराच्या व प्रतिमा प्रतीकांच्या आहारी न जाता वर्तमानकाळातील अस्सल ग्रामीण जीवनानुभव आविष्कृत करण्यातच लेखकाचे यश दडलेले आहे. अनेक कथांमधून अत्यंत सहजपणे काही विधाने येऊन जातात. आज जातीत उद्या मातीत (पृ.१२) तू मातीत मळतू, तुव्हा भाऊ बघ तुह्या जीवावर ऐश करते तिकडं, किती पागल हाय तू. (पृ.१३) रातकिड्याची किरकिर त्याचं मन सुन्न करीत होती. (पृ. १४) एक दिवसाचा पाव्हणा, दोन दिवसाचा मेव्हणा, अन् त्यापुढं राह्यलं तं कव्हा जातू जायना. (पृ.३४) घरचं झालं थोडं अन् जावयानं धाडलं घोडं. (पृ. ३६) डिवऱ्या म्हशीसारखं वथरुत पाहात.( पृ. ४०) शिलाई मशीन आणि सायकलची चाकं गतिमान झाली होती तशी विचारांचीही... (पृ.४२) आपल्याकडे लिहिणारे राबत नाहीत अन् राबणारे लिहित नाहीत. (पृ.५०) बापाचा जोडा पोराला येयाला की समजावं, त्याला काही आता आपल्याला समजावयाची गरज नाही. (पृ.११३) लचांड, गांडमनीचं, झडपणी, झकमारतू इ. ग्रामीण शब्दकोरोना, लॉकडाऊन, मास्क, मेडिकल क्वारंटाईन, डॉक्टर, ट्रॅक्टर, ट्रक, फेसबुक व्हाट्सअप इ. इंग्रजी शब्द 'आमचं मत आम्हांलाच' या कथा संग्रहामध्ये भूतकाळापेक्षा वर्तमान काळ चित्रीत होणे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील सकारात्मक जीवनशैलीचा दृष्टिकोन आहे. कथेतील विचार प्रबोधनकाळाची मूल्यचौकट आहे. कथेतील पात्र अत्यंत आशावादी, उभारी देणारी आणि आश्वासक आहेत.

**आमचं मत आम्हालाच (कथासंग्रह)**
**माधव जाधव सायास पब्लिकेशन,**
**नांदेड पृ. १२० प्रथमावृत्ती:**
**१५ ऑगस्ट २०२४**